आजचे कार्यक्रम

- पिर्न्कल मॉल त्र्यंबक नाका येथे 'दूबई फेस्टिव्हल'
- नाशिक येथील दंत शल्यचिकित्सक डॉ. शरद महाले यांच्या यांच्या सेवेच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त दंत वैद्यकीय प्रवासाचे अनुभव उलगडून दाखविणार आहेत. वेळ: सायंकाळी पाचला कुर्तकोटी शंकराचार्य सभागृह.
- शिवसेना– महाराष्ट्र नवनिर्माण सेना मेळावा स्थळ: पंचवटी– हिरावाडी रोड दीपलक्ष्मी मंगल कार्यालय ✻ सरदार चौक पंचवटी येथील चतु:शाखीय ब्रह्मवृंद गायत्रन ट्रस्ट यांच्या वतीने गोपाल मंगल कार्यालयात श्रीकृष्ण जन्मोत्सव
- स्वातंत्र्यसैनिक समिती नाशिकच्या वतीने हुतात्मा स्मारक नाशिक येथे झेंडा वंदन. वेळ : सकाळी ८.३० वाजता

वॉटरग्रेसचा 'बोरा' अडचणीत

सफाई कर्मचाऱ्यांकडून खंडणी उकळल्याची फिर्याद

नाशिक। प्रतिनिधी

नाशिक महानगरपालिकेतील सफाई ठेकेदाराने स्वच्छता कामगारांना तात्पुरती नोकरी देऊन त्यांच्या वेतनातून दरमहा बेकायदेशिररित्या 'कटिंग' स्वरुपात खंडणी उकळल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. वॉटरग्रेसचा संचालक संशयित चेतन बोरा, दीपक भंडारी व व्यवस्थापक अमर कनोजिया यांच्याविरोधात अखेर गंभीर स्वरुपाचा गुन्हा मुंबईनाका पोलिसांत दाखल झाला असून तिघांवरही कर्मचाऱ्यांना अपमानास्पद व जातीसूचक बोलून वागणूक दिल्याने ॲट्रोसिटीसह खंडणीचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे. दरम्यान, गुन्ह्याबाबत पुसटशीही कल्पना नसल्याचे सांगून चेतन बोरा याने हात 'वर' केले आहेत. त्यामुळे स्वायत्त संस्था असूनही केवळ आऊटसोर्सिंगद्वारेच सुरु असलेल्या महापालिकेत ठेकेदारांचा जाच कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मुळावर उठला असल्याचे दिसत आहे.

नाशिक महानगरपालिका आजमितीस ठेकेदारीवर अवलंबून असताना टेंडर, वर्कऑर्डर, मुदतवाढ आदी कारणांनी खासगी ठेकेदार गब्बर झाले आहेत. अशातच पैशांच्या जोरावर शहर स्वच्छतेचा ठेका घेतलेल्या 'वॉटरग्रेस' कंपनीतील अंतर्गत धूसफूस आता समोर आली आहे. कंत्राटी तत्वावर वॉटरग्रेसमध्ये सफाई कामगार असलेल्या सचिन मनोहर जाधव(वय ४८, रा. शिवक्रांती कोट, जुने नाशिक) यांच्या फिर्यादीनुसार, सन २०२२ ते जून २०२५ या कालावधीत सफाई कामगार म्हणून काम करत असताना कंपनीचे ठेकेदार चेतन बोरा, दीपक भंडारी व व्यवस्थापक अमर कनोजिया यांनी संगनमताने माझेकडून नोकरीच्या मोबदल्यात दरमहा सहा हजार रुपये व अजय अशोक नागरे, सागर रविंद्र वाघमारे, शुभम रविंद्र जाधव, मिलिंद मनोहर जाधव, सुमीत कैलास ठाकरे, अभिषेक उत्तम ठाकरे या सहा कर्मचाऱ्यांकडून त्यांच्या नेमणुकीस पासून जून २०२५ पर्यंत दरमहा सहा हजार रुपये, असे एकूण तेरा लाख १६ हजार रुपये बेकायदेशिररित्या खंडणी स्वरुपात घेतले आहेत, असे फिर्यादीत नमूद केले आहे. या अन्यायाविरोधात आम्ही विचारणा केली असता बोरा, भंडारी व कनोजिया याने जातिसूचक शब्द वापरुन सहा हजार रुपये जमा करावेच, लागतील, असे म्हणून दमदाटी केल्याचा दावा जाधव यांनी केला आहे. त्यानुसार गुन्हा दाखल असून संशयितांना अटक केली जाण्याची शक्यता आहे. तपास उपनिरीक्षक दत्ता गोडे करत आहेत.

मला कल्पनाच नाही: बोरा

या गुन्ह्याबाबत चेतन बोरा यांची प्रतिक्रिया घेण्यासाठी संपर्क साधला असता, त्यांनी 'या प्रकरणाची मला काहीच माहिती नाही व कल्पनाच नाही' असे सांगून नामानिराळे राहण्याचा केविलवाणा प्रयत्न केला आहे. दरम्यान, ठेकेदार बोरा व अन्य दोघांनी माझ्याकडून वेतनातून जशी खंडणी उकळली आहे, त्याच पद्धतीने वॉटरग्रेसमध्ये काम करणाऱ्या सर्वच सफाई कामगारांकडून दरमहा सहा हजार रुपये धमकावून घेत खंडणी उकळल्याचे जाधव यांनी नमूद केले आहे. आजमितीस सातशे सफाई कामगार कार्यरत असून त्यांच्या वेतनातून सहा हजार रुपयांप्रमाणे दरमहा ४२ लाख रुपयांवर डल्ला मारून उघड लूट सुरु असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे हा घोटाळा कोट्यवधी रुपयांपर्यंत असण्याचा दावा कामगारांनी केला आहे.

फिर्यादीनुसार, कर्मचाऱ्यांचा छळ आणि खंडणी उकळण्यात आल्याचे समोर येत असले तरी प्रकरणाला टक्केवारीचा वास असल्याचे समजते. भाजपच्या आमदार प्रा. देवयानी फरांदे यांनी बोराची ठेकेदारी व कार्यपद्धतीवर आक्षेप घेऊन नुकतीच महापालिका आयुक्त मनीषा खत्री यांच्याकडे तक्रार केली होती. त्याचा बेजाबदारपणा व सफाई कामगारांच्या आर्थिक छळाबाबत कठोर कारवाईची मागणी केली होती. त्यानुसार आता गुन्हा नोंद आहे.

ड्रायपोर्टसाठी आवश्यक रेल्वेलाईनच्या कामाला वेग

एजन्सी नेमणुकीची प्रक्रिया गतिमान

नाशिक। प्रतिनिधी

ड्रायपोर्टला जोडण्यासाठी अत्यावश्यक असणाऱ्या रेल्वे लाईनच्या उभारणीसाठीची प्रक्रिया वेगाने सुरू झाली आहे. या कामासाठी एजन्सी नेमण्याची हालचाल अंतिम टप्प्यात असून, लवकरच प्रत्यक्ष कामाचा शुभारंभ होणार असल्याची माहिती अधिकृत सूत्रांनी दिली.

ड्रायपोर्टच्या उभारणीला गती मिळाली असली तरी रेल्वे लाईनसाठी आवश्यक जागा अधिकृत करण्याचा प्रश्न बराच काळ प्रलंबित होता. शेतकऱ्यांशी जागा व दर याबाबत चर्चा सुरू होती. मात्र, समाधानकारक तोडगा निघत नव्हता. परिणामी या महत्त्वाच्या टप्प्यावर काम ठप्प झाले होते.

शासनाने वेळोवेळी शेतकऱ्यांशी संवाद साधून तोडगा काढण्याचा प्रयत्न केला. अखेर 'तोडगा निघाला नाही तर थेट अधिग्रहण' असा इशारा दिल्यानंतर प्रक्रिया गतिमान झाली. यात सुमारे २५ शेतकऱ्यांच्या जमिनी अधिकृत करण्यात आल्या असून, त्यांना नुकसानभरपाई अदा करण्यात आली आहे.

या निर्णयामुळे ड्रायपोर्टच्या रेल्वे मार्गाचा अडथळा दूर झाला आहे. आता एजन्सी नेमणुकीची प्रक्रिया जलदगतीने सुरू असून, विविध शासकीय पातळीवरील कागदपत्रांची पूर्तता होत आहे. अधिकृत सूत्रांच्या मते, लवकरच प्रत्यक्ष कामालाही प्रारंभ होईल.

कसबे सुकेणे हे ड्रायपोर्टपासून साधारण दीड किलोमीटर अंतरावर असल्याने, या रेल्वे जोडणीमुळे भविष्यात अवजड मालाच्या वाहतुकीसाठी थेट मालगाड्यांची सोयीस्कर हालचाल शक्य होणार आहे.

थोडक्यात

पंचवटीत साडेपाच लाखांची घरफोडी

नाशिक । पंचवटीत भरदिवसा बंद घराचा कडीकोयंडा तोडून चोरट्यांनी साडेपाच लाखांची घरफोडी केली. ऋषिकेश मधुकर दराडे यांनी फिर्याद दिली असून मंगळवारी (दि.१२) दुपारी तीन ते चार वाजेच्या दरम्यान, दराडे कुटुंब बाहेर असताना अज्ञात चोरट्यांनी बंद घराचा कडीकोयंडा तोडून घरातून ५ लाख ६३ हजार ७५० रुपयांचे सोन्याचे दागिने चोरून नेले.

वाहनांची चोरी

नाशिक । इंदिरानगर परिसरातील पेठेनगर रोडवरील अपार्टमेंटच्या पार्किंगमधून चोरट्यांनी सव्वा लाखांची महागडी दुचाकी चोरून नेली. राज भिकाजी परदेशी यांची १ लाख ३० हजारांची दुचाकी चोरट्याने मंगळवारी (दि. १२) मध्यरात्री इमारतीच्या पार्किंगमधून चोरून नेली. इंदिरानगर पोलिसात गुन्हा दाखल आहे. तर, मोसीन अस्लम खाप यांची ४५ हजारांची दुचाकी मंगळवारी (दि.१२) मध्यरात्रीच्या सुमारास वडाळानाक्यावरील नागसेननगर येथील निरंजन गॅरेजशेजारुन चोरट्यांनी चोरून नेली. मुंबई नाका पोलिसात गुन्हा दाखल आहे.

प्रेयसीची आत्महत्या; तरुण पसार

नाशिक। प्रतिनिधी

तरुणीशी प्रेमसंबंध असतानाही प्रियकराने तिच्याच मैत्रिणीशी संबंध जोडल्याने तणावात गेलेल्या नवोदित फोटोग्राफर प्रेयसीने उंदीर मारण्याचे विषारी औषध पिऊन आत्महत्या केली आहे.

मुंबईनाका पोलीस ठाण्यात मृत तरुणीच्या भावाने बहिणीस आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी संशयित साहिल रमेश विधाते याच्याविरोधात फिर्याद दाखल केली असून गुन्हा दाखल झाला आहे. संशयित प्रियकर साहिल व त्याची दुसरी प्रेयसी हर्षदा पसार झाल्याचे समजते. लक्ष्मी हिरामण वाघ असे मृत प्रेयसीचे नाव आहे.

लक्ष्मीचा भाऊ रोशन याच्या फिर्यादीनुसार, त्याची बहीण लक्ष्मी ही फोटोग्राफीचे व्यावसायिक शिक्षण पूर्ण करत होती. ती अहिल्यानगर जिल्ह्यातील लोणी येथून मे २०२५ मध्ये एक महिन्यांचा फोटोग्राफी अभ्यासक्रम पूर्ण करुन घरी परतली होती व आनंदी जीवन जगत होती. अशातच, १५ जून रोजी ती आईसह जात असताना नागजी चौकात तिला मैत्रीण हर्षदा भेटली. तेव्हा लक्ष्मीने 'तू मला काही नको सांगू, काय करायचे ते मला माहीत आहे', असे म्हणताच दोघींत वाद झाले. यानंतर, लक्ष्मीच्या आईने तिला घरी आणून शांत केले. रोशन व आईने तिच्याकडे विचारणा करताच, 'माझे मार्च महिन्यापासून साहिल विधातेशी प्रेमसंबंध होते आणि त्यातून त्याने विवाहाचे वचन दिले होते'. साहिलने माझ्या अपरोक्ष मैत्रिण हर्षदाशी देखील प्रेमसंबंध प्रस्तापित केले, असे लक्ष्मीने सांगितले. तेव्हा लक्ष्मीच्या आईने तिची समजूत काढून साहिलचा विचार सोडून दे, असे सांगितले. परंतु, लक्ष्मीने नकार देत साहिलने मला धोका देऊन आयुष्य उद्धस्त केले आहे असे सांगितले. त्यामुळे ती सतत तणावात होती व घरात बोलतही नव्हती. दरम्यान, ३ ऑगस्ट रोजी रोशन बणी येथे गेला असता आई रुक्मिणी सायंकाळी भाजीपाला विक्रीकरिता गेली होती. तेव्हा लक्ष्मीने घरात कुणीही नसल्याची संधी साधून उंदिर मारण्याचे औषध पिऊन घेतले. रुग्णायात दाखल केले असता उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला.

चायनीज वस्तूंच्या विक्रीआड 'रेकी'; सात अटकेत

म्हाळसाकोरे शिवारातील दरोड्याचा एलसीबीकडून छडा

नाशिक। करंजी। चांदोरी प्रतिनिधी। वार्ताहर

जिल्ह्यातील विविध तालुक्यात 'दिवसा' चायनीज वस्तू विक्रीसाठी येऊन मध्यरात्री दरोड्यासाठी ठावकि सधन घरांची 'रेकी' करुन डाव साधणाऱ्या मालेगाव, बीड, रायगड येथील सराईत दरोडेखोरांना गजाआड करण्यात नाशिक ग्रामीण पोलिसांना यश आले आहे. विशेष म्हणजे यातून निफाडच्या म्हाळसाकोरेत घडलेल्या मुरकुटे दरोडाकांडाची उकल झाली असून निफाड व सिन्नरकरांनी सुटकेचा निःश्वास सोडला आहे. पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांनी पत्रकार परिषदेत गुरुवारी या प्रकरणाची संविस्तर माहिती दिली.

म्हाळसाकोरे शिवारातील राजेंद्र मुरकुटे यांच्यासह इतर तीन शेजाऱ्यांच्या घरावर दरोडेखोरांनी १३ जुलै रोजीच्या मध्यरात्री दरोडा टाकून अनेकांना अमानुष मारहाण करीत चार लाखांचे सोन्याचे दागिने हिसकावून नेले होते. कोयत्याचा धाक दाखवून. दरोडेखोरांनी रात्रभर धुमाकूळ घातला होता. याप्रकरणी सायखेडा पोलिसात गुन्हा दाखल होता. समांतर तपास स्थानिक गुन्हेशाखा (एलसीबी) करीत असताना संशयिताच्या माहितीशिवाय दरोड्याची घटना घडणार नाही, या दिशेने पोलिसांनी तपास केला. तांत्रिक विश्लेषणातून काहीशी माहिती हाती लागल्यानंतर संशयित दिलीप चव्हाण यास ताब्यात घेतले. त्याने गुन्ह्याची कबुली देतानाच विविध ठिकाणी चोरी, दरोडा टाकल्याचे सांगितले. त्याच्या टीपनुसार संशयित

विशाल बनसोडे, राहुल चव्हाण यांना अटक करण्यात आली आहे व गुन्ह्यात वापरलेली दुचाकी, मोबाईल आणि कोयता जप्त केला आहे. पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, अपर अधीक्षक आदित्य मिरखेलकर यांच्या सूचनेने स्थानिक गुन्हेशाखेचे प्रभारी निरीक्षक रवींद्र मगर, सायखेडच्याचे सहायक निरीक्षक विकास ढोकरे, स्थानिक गुन्हेशाखेच्या सहायक निरीक्षक योगिता कोकाटे, अंमलदार हेमंत गरुड, सचिन धारणकर, दीपक गुंजाळ, हेमंत गिलबिले, प्रितम लोखंडे, प्रदीप बहिरम, सुभाष चोपडा, दत्ता माळी, नितीन गांगुडे या पथकाने ही कामगिरी केली. दरम्यान, संशयित दिलीप चव्हाण, राहुल चव्हाण हे म्हाळसाकोरे गावापासून काही अंतरावरील गावांत वास्तव्यास आहेत. हे दोघे भाजीविक्री, मोबाईलचे ॲक्सेसरीज, गृहोपयोगी असा चायनीज माल विक्रीसाठी गावोगाव फिरत असतं. म्हाळसाकोरेत त्यांनी अशाच पद्धतीने फिरताना रेकी केली. यानंतर, राहुलने फिर्यादी मुरकुटे यांच्या घरी दरोड्याच्या दोन दिवस आधी जेवण केले होते, असे उघड झाले आहे.

विशाल बनसोडे, दिलीप चव्हाण , राहुल चव्हाण यांना नाशिक ग्रामीणच्या स्थानिक गुन्हेशाखेच्या पथकाने मालेगावातून अटक केली. तर, अजय एकनाथ चव्हाण, आकाश पंजाबराव चव्हाण (रा. होराळे, ता.खालापूर, जि.रायगड. मूळ रा. उसगाव, जि. संभाजीनगर), सोमनाथ भानुदास चव्हाण (रा. भिलवली, ता. खालापूर, जि. रायगड, मूळ. रा. ढालगाव, ता. जामखेड, जि. जळगाव) यांना रायगड पोलिसांनी पाली येथील दरोड्याच्या गुन्ह्यात अटक केली असून, रोहिदास उर्फ बन्नी चव्हाण (रा. अजंग वडेल, ता. मालेगाव) हा पसार आहे.

असा रचला कट

संशयित विशाल, दिलीप व राहुल यांनी म्हाळसाकोऱ्यात रेकी केल्यानंतर दरोडा टाकण्यासाठी रायगड जिल्ह्यातील सराईतांना बोलाविले. रायगड येथून आलेले चौघेही सराईत दरोडेखोर असून, त्यांच्याविरोधात मुंबई शहर, सातारा, रायगड, पुणे ग्रामीण, बुलढाणा, सोलापूर, ठाणे ग्रामीण आणि नाशिक ग्रामीणमध्ये घरफोडी, चोरी, दंगा, दुखापत, अपहरण यासारखे २३ गुन्हे दाखल आहेत. संशयित दुचाकीने म्हाळसाकोरेत आले आणि त्यांनी रेकी केलेल्या चार–पाच घरांना लक्ष्य करुन दरोडा टाकला होता.

ठळक मुद्दे

- दरोड्यांमुळे ग्रामस्थ होते भयभीत
- तिघांना स्थानिक गुन्हेशाखेने तर, चौघांना रायगड पोलिसांनी केली अटक
- रेकी करुन संगनमताने दरोड्याचा रचला कट
- दरोड्यांमुळे गावकरी रात्र गस्त करत होते

क्लासिफाईड /सुपरमार्केट

पाहिजेत

भगूर देवळाली कॅम्प परिसरातीलच इाइव्हर पाहिजे. संपर्क – 9823054441 पगार – ९०००/–
(16/08-BK-3904)

भाड्याने देणे

ना.रोड बिटको कॉलेजमागे, तरण तलाव समोर गाळा भाड्याने देणे आहे. ३३६ चौ.फु. संपर्क : 8424023035 / 8779049365.
(12/08-BK-3818)

विकणे आहे

TDR for Sale Ready DRC - Contact - 8275055500.
(17/8-CM-518)

शेती विकणे आहे - खंबाळे शिवारात रोड लगत ३० गुंठे शेती विकणे आहे. मो नं. 9422271129. प्रतिक दिलीप मोरे, त्र्यंबकेश्वर.
(17/08-BK-3943)

दारुबंदीचा गुरुमंत्र

द ग्रेट साईंटिस्ट... (best doctor & gold medal awarded) डॉ.पालवे ॲडमिट करा... ।। नका करू... पेशंटला सांगा...।। नका सांगू... पेशंटला आणा... ।। नका आणू... ✻ व्यसन पेशंटचे... विश्वास तुमचा... उपचार आमचे... Lifelong व्यसनापासून १०० टक्के मुक्ती... सर्व सुविधांनी परिपूर्ण : ✻ व्यसनमुक्ती Special पॅक, मेडिसीन, इंजक्शन स्प्रे, ड्रॉप, ऑपरेशन, गोळी टाकणे, मंत्रोपच्चार... ॲडमिट सुविधा... ✻ (विशेष) गरिबांसाठी फीमध्ये सवलत... तर संपर्क : 9552619752. डॉ.पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. (09/01/26)
(CRINV-23-24JL/CRG00555)

व्यसनमुक्ती

गॅरंटीने सोडवा. दारू + गुटखा + सिगारेट + बिडी + मावा + तंबाखू + बार + खैनी + भांग + गांजा + अफिम + जर्दा + ताडी + स्नेकबाईट + व्हाईट पावडर + व्हाईटनर + हिरॉईन + चरस + कोकेन + एमडी + एल.एस.डी. डॉट पेपर + झोपेची गोळी + इंजेक्शन... डॉ.पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. मो. 9552619752. www.drpalve nashamukti kendra.in, १००% रिझल्ट. (09/01/26)
(CRINV-23-24JL CRG00554)

जाहिराती

सर्व आजारांसाठी

जुनाट सर्दी, जुनाट दमा, जुनाट गुडघेदुखी, चालता, बसता, उठता न येणे, जुनाट संधीवात/चिकन गुनिया, जुनाट ॲलर्जी, जुनाट अर्धशिशी, जुनाट मूळव्याध, एचआयव्ही, भूक लागत नाही? वजन कमी? थकवा जाणवतोय?, Low CD4 Count? उपचार सर्वांसाठी, सर्व आजारांसाठी. भेटा– अहमदनगरचे सुप्रसिद्ध डॉक्टर पालवे, वरणगाव. मो.नं. 9552619752. (09/01/26)
(CRINV-23-24JL/CRG00556)

नावात बदल

We are Mr Kiran jayantilal patel & Mrs Rachana Kiran patel want to change our daughter's name Anchal kiran patel has been changed to Aanchal kiran Patel as per Document (CM-521)

My old name was R.H. Shaikh has been changed to my new name Shaikh Abdul Rashid Hasan Bhai as per Aadhar Card No. 413334460850. (BK-4010)

My old name Abhishek Ajay Rabhadia / Rabhdiya has been changed to my new name Abhishek Ajay Rabhadiya as per Gazatte No.M25161565 (CM-520)

जाहिरात छोटी ! किमया मोठी !!

टीप : बाळाचा फोटो प्रकाशित करण्यासाठी रु. १००/- शुल्क आकारले जाईल.
या सदरात केवळ १ ते ५ वर्षादरम्यानच्या बाळाचेच फोटो प्रकाशित केले जातील.

✻ **जाहिरात विभाग,** दै.देशदूत, एम.जी.रोड, नाशिक. ०२५३- २५७५७१६ ✻**नाशिकरोड :** प्रतिक आर्केड, शॉप नं. २५, देना बँकेच्या वरती, बिटको पॉईंट. ०२५३-२४६२७५६✻ **निफाड :** मार्केट कमेटी, व्यापारी संकुल, बसस्टॅण्डशेजारी, गोदावरी प्रिंटींग प्रेसच्या वरती. ०२५४७-२२११००✻**दिंडोरी** :दिंडोरी कृ.उ.बा. समिती कॉम्पलेक्स, पंचायत समिती गेटसमोर. ०२५४७-२२२८८८✻ **मालेगांव :** पांजरापोळ शॉपिंग सेंटर, छ.शिवाजी पुतळ्यजवळ. ०२५५४-२४३४६२२✻**सिन्नर :** दुसरा मजला, मोतीकमल टॉवर, बसस्थानकासमोर. ०२५५१-२२२१५१. या कार्यालयामध्ये बाळाचे फोटो स्विकारले जातील.

आवक वाढली, दरात घट

नाशिक । नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीच्या भाजीपाला, फळभाज्या विभागात भेंडी, कारले, वांगी, घेवडा, वाल, ढोबळी मिरचीची, शेवगा, काकडीची आवक वाढलेली आहे. त्यामुळे दरात किंचित घट झालेली आहे. मात्र, उठाव कमी असल्याने मंदीची झळ शेतकऱ्यांना बसत आहे. भेंडीचे एक जाळी २०० ते ३०० रुपये, काकडी २०० ते ५०० रुपये, वाल ४०० , दोडका ४०० ते ५००, गिलके ३०० ते ५००, वांगी १५० ते ३५० जाळी दराने लिलावात विक्री झाली. शेवगा ४० ते ५० रुपये प्रतिकिलो दर डांगर २० ते ३० रुपये दराने विक्री होत होती.

कालचे कांदा भाव

	आवक (क्विं.)	किमान	कमाल	सरासरी
पिंपळगाव	१७६००	९००	२२०१	१६००
विंचूर	१४७५६	६००	१७००	१६००
निफाड	७८१५	६००	२०००	१६००
सायखेडा	–	१०००	१९००	१५७५

निधन वार्ता

प्रकाश वारे

नाशिक । येथील प्रकाश खंडेराव वारे (८०) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

सायलेन्सर चोर सक्रिय

नाशिक । लेखानगर येथे पार्क केलेल्या डॉक्टरच्या इको कारचे सायलेन्सर अज्ञात चोरट्यांनी चोरून नेले. अमित राजन चव्हाण (रा. इंदिरानगर) यांच्या फिर्यादीनुसार, लेखानगर येथील लाईफ केअर हॉस्पिटलचे डॉ. उमेश मराठे यांच्या मालकीची इको कार ९ ते ११ तारखेदरम्यान हॉस्पिटलच्या गेटसमोर पार्क असताना अज्ञात चोरट्यांनी कारचे ३५ हजारांचे सायलेंसर चोरून नेले. अंबड पोलिसात गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान, गेल्या महिनाभरातील ही दुसरी घटना असून चोरट्यांना पकडण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे.

तडीपार अटकेत

नाशिक । नारायण बापूनगर परिसरातून तडीपार गुंडाला अटक करण्यात आली आहे. पराग उर्फ गोट्या राजेंद्र गायधनी (३५, रा. गायधनी निवास, जेलरोड) असे संशयिताचे नाव आहे. परागला आयुक्तालयाने २०२३ पासून शहर–जिल्ह्यातून तडीपार केले होते. तरी आदेशाचे उल्लंघन करुन शहरातच असल्याची माहिती युनिट दोनच्या पथकाला मिळाली. बुधवारी (दि.१३) रात्री त्यास लोखंडे मळ्यातून अटक करण्यात केली. उपनगर पोलिसात गुन्हा दाखल आहे.

महाराष्ट्र राज्य लॉटरी
महाराष्ट्र गणेशलक्ष्मी रक्षा बंधन विशेष मासिक सोडत
लिलाव क्रि. क्र. १००/- - जोडत लसांक 08 - जोडत दिनांक 11/08/2025

मालिका	GS-01	GS-02	GS-03	GS-04	GS-05	GS-06	GS-07	GS-08	GS-09
मुख्य बक्षीस सीरिज २ 22 लाख	–	–	2165	–	–	–	–	–	–
प्रोत्साहन सीरिज २ 9000/- (४ x ३०००/- x ४ सीरीज)	2165	2165 सोडत-२०१८	–	2165	2165	2165 मे २०२५पासून ३ वर्षे	2165	2165	2165 सहा सोडतीत समान

अंक मालिकाशी - FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES - अंक मालिकाशी

दुसरे बक्षिस रु. 10000/-	6324			7239			8114		
आजच्या सोडतीत रु. 10000/- ची अंतर्गत 14 बक्षिसे विजेती									
तिसरे बक्षिस- 5000/-	0013	1003	1798	1931	3053	4183	7058	8259	8640	8773
चौथे बक्षिस- 2000/-	0306	0788	1751	2003	2610	2779	3979	4978	6404	8971
पाचवे बक्षिस रु. 1000/-	1250	3366	3884	4076	5218	5515	5647	7430	8907	9479
सहावे बक्षिस रु. 500/-	1063	4174	5909	6145	6993	7381	8226	8911	9141	9422

रु. 230/- सात्वे बक्षीस रु. 230/- (सर्व मालिकांसाठी)

अंक मालिकाशी										
0042	0764	1651	3213	3939	3938	4030	5237	6179	6961	7936	8983	9247
0059	0801	1667	2321	3030	4154	4942	5548	6180	7050	7767	8583	9365
0063	0858	1715	2355	3101	4172	4944	5552	6226	7074	7770	8595	9367
0077	0943	1719	2390	3103	4184	4950	5584	6242	7103	7775	8624	9386
0095	0991	1776	2412	3187	4245	4960	5589	6255	7120	7777	8666	9388
0104	1074	1780	2422	3224	4274	4971	5590	6256	7124	7797	8698	9419
0109	1034	1818	2459	3235	4360	4972	5595	6382	7157	7820	8789	9492
0114	1041	1824	2484	3244	4400	5065	5659	6443	7176	7826	8802	9496
0163	1043	1835	2492	3270	4404	5090	5680	6456	7177	7847	8804	9497
0189	1048	1891	2524	3310	4410	5096	5751	6475	7197	7930	8817	9509
0268	1118	1897	2554	3325	4423	5104	5758	6539	7244	7956	8826	9537
0326	1145	1943	2555	3333	4430	5116	5759	6566	7365	7975	8835	9612
0369	1154	1951	2572	3339	4468	5149	5771	6508	7495	7998	8839	9648
0398	1160	1961	2582	3359	4481	5182	5821	6620	7506	8034	8870	9686
0444	1172	2060	2660	3360	4511	5212	5869	6641	7531	8045	8911	9736
0478	1181	2032	2708	3375	4576	5232	5907	6649	7549	8047	8928	9791
0539	1303	2112	2712	3395	4584	5236	5913	6653	7575	8065	8936	9798
0576	1308	2113	2713	3403	4595	5268	5920	6656	7578	8097	8941	9804
0604	1362	2129	2718	3430	4661	5296	5939	6662	7584	8102	8973	9806
0633	1428	2142	2731	3515	4664	5331	5954	6667	7618	8181	8985	9819
0657	1443	2163	2734	3536	4688	5355	5957	6679	7643	8226	9016	9884
0665	1445	2164	2750	3665	4721	5360	5975	6701	7660	8263	9055	9889
0694	1512	2189	2809	3694	4746	5364	6078	6722	7682	8305	9129	9892
0737	1521	2190	2821	3723	4772	5382	6107	6726	7702	8385	9172	9921
0739	1572	2203	2822	3796	4786	5421	6126	6727	7707	8449	9176	9923
0741	1599	2242	2842	3810	4856	5458	6128	6747	7709	8486	9232	9932
0776	1612	2273	2873	3831	4894	5471	6137	6798	7712	8545	9294	9948
0779	1619	2294	2926	3839	4901	5498	6153	6867	7721	8557	9300	9961

छपाईतील कोणत्याही दुरुस्तीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अधुरा निकालासाठी अधिकृत पॉइंट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

वाचकांना विनम्र सूचना

'देशदूत' वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत दावा केल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात, त्याची देशदूत वृत्तपत्र समूह कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल देशदूत वृत्तपत्र समूहाचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.